Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ४५] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ११-१७, २०२१/कार्तिक २०-२६, शके १९४३ [पृष्ठे १२, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-२ |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २-१२ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९८५.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated 14th October, 2021.

No. Sankirna 2021-C.R.54-D-XIV.—

In exercise of the powers conferred by sub-section (*8*) of the Section 24 of the Code of Criminal Procedure, 1973 and Section 15 of the Scheduled Castes, and Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989, the Government of Maharashtra hereby appoints Adv. Pradeep Vathore as “ Special Public Procecutor ” for conducting the case in Hon’ble Sessions Court, Washim which is arising out of C.R. No. 368/2018 registered at Karanja City Police Station, District Washim.

2. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

3. The fees of Adv. Pradeep Vathore, shall be paid by Social Justice and Special Assistance Department as per the proposal approved by this Department.

4. The Government reseves right to revoke/modify/annul the order without assigning any reasons.

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAVIN A. KUMBHOJKAR,
Deputy Law Advisor Cum Deputy Secretary,
Law & Judiciary Department.

---

# संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९८६.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

क्रमांक उविअ-दंडप्र-कली-कावि-७००-२०२१.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांने भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना, क्रमांक उविअ-भूसं-कली-कावि-२७९-२०२०, दिनांक १० ऑगस्ट २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची गरज भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीमध्ये " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनूसची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केली जात असून, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्याकरिता उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वणी यांना पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

### संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०५-४७-२०२०-२१,
मौजा पेंढरी, ता. मारेगांव, जि. यवतमाळ.

| अनु-क्रमांक | भूसंपादन किंवा गट क्रमांक | एकूण क्षेत्र | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | हे. आर |
| १ | ९३ | १ ५५ | ० ३१ |
| २ | ३२ | १ ६७ | ० २६ |

**अनुसूची-एक**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | | हे. आर | हे. आर |
| ३ | ३५ | ११ ६८ | ० ४५ |
| ४ | ३४ | १ ५२ | ० २७ |
| | ६२ | २ ८७ | ० २७ |
| ५ | ३१ पैकी | ४ २५ | ० २७ |
| | ३१ पैकी | | ० २२ |
| ६ | ३० पैकी | ८ २५ | ० ०९ |
| ७ | ३० पैकी | | ० ०९ |
| ८ | ३६ | ३ ८५ | ० ०४ |
| ९ | ४६ | ३ ७३ | ० २० |
| १० | ४५ | ३ ७१ | ० २३ |
| ११ | ३७ | ३ ९६ | ० १९ |
| १२ | ४२ | ३ ९६ | ० ३६ |
| | एकूण . . | ४४ ७३ | २ ९८ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव :- सुसरी-पेंढरी रस्त्याचे बांधकामाकरिता.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- लोकोपयोगी.

समाजाला मिळणारे लाभ :- रस्त्याकरिता.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

— निरंक —

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

— निरंक —

**टीप** :—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वणी यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**अमोल येडगे,**
जिल्हाधिकारी,
यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक १८ ऑक्टोबर २०२१.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९८७.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.–**

क्रमांक कावि-अ.का.-भूसं-१५२७-२०२१.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, क्रमांक २४३, दिनांक २६ ऑगस्ट २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जामोद, ता. जळगांव जामोद, जि. बुलडाणा यास पदनिर्देशीत करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक १४-२०२०-२१,
गाव पळशीघाट, ता. जळगांव जामोद, जि. बुलडाणा.

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३३ | १ ७७ |
| २ | ३९ | १ ३१ |
| ३ | ४० | १ ०२ |
| ४ | ४३ | ० ६० |
| ५ | ४३ | ० १० |
| | एकूण . . | ४ ८० |

**संपादनाचे प्रयोजन :** मौजा आडोळ खु. या गावाचे पुनर्वसनाकरीता.

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :— | जिगांव प्रकल्प, नांदुरा, जि. बुलडाणा. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | जिगांव प्रकल्पांतर्गत बाधित होणा-या मौजा आडोळ खु.चे पुनर्वसनाकरीता नविन गावठाण, मौजा पळशीघाट शिवारातील भूसंपादन प्रस्ताव. |

समाजाला मिळणारे लाभ :— या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे .

## अनुसूची–तीन

## बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

सदर प्रकल्प हा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून त्यास शेतक-यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्याने तसेच त्यामधील विस्थापित होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची–चार

## सामाजिक परीणाम निर्धारणाचा सारांश

नवीन भूसंपादन कायदा, २०१३ कलम (६) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे. या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरचा प्रकल्प हा अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील दुष्काळ प्रवण भागातील असून कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून यामध्ये वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जामोद कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**एस राममुर्ती** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक ३० सप्टेंबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९८८.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भू.सं.-अ.का.-कावि-६९१-२०२१.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण दिनांक ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त अधिसूचना ” असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानता येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त जमीन ” असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश “ उक्त सार्वजनिक प्रयोजन ” असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने प्रकरणातील नमूद सर्व्हे क्रमांकातील जमिनीच्या भूसंपादनामुळे बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही. त्याची कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणताही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ६९-४७-२०१२-१३,
मौजा रेडवा, तालुका चांदुर बाजार, जिल्हा अमरावती.

| अनुक्रमांक | सर्व्हे नंबर/ गट नंबर | अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १३/१ | ० १० |
| २ | ३०/१ | ० ०७ |
| ३ | ३०/२ | ० ०७ |
| | एकूण . . | ० २४ |
| | भूसंपादनाचे एकूण क्षेत्र . . | ० २४ |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अचलपूर. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | रेडवा ते गावठाण सडक कामाकरिता. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | गावातील लोकांना दळण वळणासाठी व शेती पुरक व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ व रोजगारनिर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहे. |

## अनुसूची-तीन

### बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

प्रस्तावात नमूद प्रकरणातील भूसंपादित सर्व्हे क्रमांक मधील जमिनीमध्ये कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही.

## अनुसूची-चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

| | | |
|---|---|---|
| (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश | :— | भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क व अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) व त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ महसूल व वन विभाग, मुंबई, दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसूचने अन्वये सामाजिक भाव निर्धारणातून सूट देण्यात आली आहे. |

## अनुसूची-पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे नाव व पदनाम | :— | प्रस्तावात नमूद भूसंपादित सर्व्हे क्रमांक मधील जमीन रेडवा ते गावठाण सडक सुधारणाकरीता संपादित करावयाची असल्यामुळे व प्रस्तावित जमिनीत पुनर्वसन व पुनर्वसाहत होत नाही म्हणून प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | :— | निरंक. |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली, त्या अधिसूचनेचा तपशिल | :— | निरंक. |

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**पवनीत कौर,**
जिल्हाधिकारी,
अमरावती.

अमरावती :
दिनांक ०७ ऑक्टोबर २०२१.

भाग १ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ९८९.

## उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) तथा सदस्य सचिव, यांजकडून

**वाचा :** (१) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संकिर्ण-०३-२०१५-प्र.क्र.३४-अ-२, दिनांक १२ मे २०१५.

(२) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संकिर्ण-०३-२०१५-प्र.क्र.३४-अ-२, दिनांक ३० सप्टेंबर २०१५.

(३) म.शा. महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-भाग-अ-२-मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २५ जानेवारी २०१७.

**खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेणेबाबत**

क्रमांक उपजिभूसं-लसिंकामे-कावि-३१६-२०२१.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांनी सामदा सौंदडी बृहत लघु प्रकल्पाचे प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. ०३-२०१५-प्र.अ.३४-अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने घेण्याबाबत त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. १३८७-२०२०-अ.पा.वि.अ.-रेशा-सामदा सौं.-भूसंपादन-२०२०, दिनांक ०१ जून २०२० नुसार सरळ खरेदी प्रस्ताव १२-४७-२०१९-२०, मौजा कासमपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती एकूण ०.८० हे. आर चा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे मार्फत प्राप्त झाला आहे. तथापि, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, दर्यापूर यांचे पत्र जा.क्र.७०५-भूमापन-भूसं-मौजा कासमपूर-२०२१, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२१, नुसार प्राप्त संयुक्त मोजणी अहवालानुसार सदर प्रस्तावाचे अंतिम क्षेत्र ०.४० हे. आर निश्चित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश पत्र क्र. अ.का.-प्र.अ.-भूसंपादन-कावि-२६१-२०२०, दिनांक ०२ जून २०२० अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र.एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता ;

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघु सिंचन कामे, अमरावती तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, अमरावती याद्वारे,

### अनुसूची (एक)

खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे आणि ;

### अनुसूची (दोन)

सामदा सौंदडी बृहत लघु प्रकल्पाचे प्रयोजनाकरीता जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने संपादित करतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूमि संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलमे २६ ते ३० च्या शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

### अनुसूची (तीन)

संबंधित भूधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीपद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करून देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

(४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखड्याची प्रत कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (चार)

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक १२-४७-२०१९-२०, मौजा कासमपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे सामदा सौंदडी बृहत लघु प्रकल्पाचे प्रयोजनाकरीता समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमिनीचा तपशील–

| अ. क्र. | मौजा | गट/ सर्व्हे क्रमांक | भो.व | नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | हे. आर | हे. आर |
| १ | कासमपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती | ११० | १ | ४ १२ | ० ४० |
| | | | एकूण . . | ४ १२ | ० ४० |

अमरावती :
दिनांक २५ ऑक्टोबर २०२१.

(अवाच्य),
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
लघु सिंचन कामे तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय समिती, अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९९०.

## उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

**वाचा :** म.शा. महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-भाग-अ-२-मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २५ जानेवारी २०१७.

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेणेबाबत**

क्रमांक अका-भू.सं.-कावि-६३४-२०२१.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांनी वासणी मध्यम प्रकल्प ने बाधीत होणा-या वासणी मध्यम प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राकरीता या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण ०३-२०१५ प्र.क्र.३४-अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नांवे घेण्याबाबत त्यांचे पत्र क्र. ४४६-२१, दिनांक ०८ फेब्रुवारी २०२१ भूसंपादन प्रस्ताव क्र. ०१-४७-२०२०-२१, मौजा बोरगाव पेठ एकूण क्षेत्रफळ ६५.०६ चौ.मी., हे. आर प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र. १३९-२१, दिनांक ०८ मार्च २०२१ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगीक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता ;

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, संदीपकुमार श. अपार, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर याद्वारे,

## अनुसूची (एक)

खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे आणि ;

## अनुसूची (दोन)

प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी करतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलमे २६ ते ३० च्या शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

## अनुसूची (तीन)

संबंधित भूधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करून देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अभियंता, नविन लहान पाटबंधारे, उपविभाग अचलपूर यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत उपविभागीय अभियंता, नवीन लहान पाटबंधारे, उपविभाग, अचलपूर यांचेमार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

(४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखड्याची प्रत उपविभागीय अभियंता, नवीन लहान पाटबंधारे, उपविभाग, अचलपूर यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (चार)

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-४७-२०२०-२१, मौजा बोरगाव पेठ, ता. अचलपूर, जि. अमरावती

प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट (खरेदी घ्यावयाच्या) जमिनीचा तपशील

| अ. क्र. | मालमत्ता क्रमांक | गाव नमुना ८ प्रमाणे एकूण क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | | |
| | | चौ.मी. | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | ४४९/१ | ३२.५३ | ३२.५३ | ६५.०६ |
| | एकूण . . | ३२.५३ | ३२.५३ | ६५.०६ |

**संदीपकुमार शं. अपार,**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी,
अचलपूर.

अचलपूर :
दिनांक १४ ऑक्टोबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९९१.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, कलम १९(१) अन्वये**

क्रमांक उविअ-अका-भूसं-कावि-२८१-२०२१.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा केला आहे) याचा

कलम ११, पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक १९६६, दिनांक ०६ जुलै २०१७ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, वाशिम (जिल्ह्याच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केली जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी सखाराम प्रकाश मुळे, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरुळपीर यांना पदनिर्देशीत करीत आहे.

## अनुसूची-एक

## भूमीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ११-४७-२०१९-२०,
गावाचे नाव : मौजे नगर परिषद, मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम

| अनुक्रमांक | सर्व्हे नंबर/ गट नंबर | अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर मी. |
| १ | २१७/२ अ/1 | ०.१५.३७ |
| | एकूण . . | ०.१५.३७ |

## अनुसूची-दोन

| | | |
|---|---|---|
| सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण | :— | पर्यायी दुकान केंद्र विकसित करण्याचे कामाकरीता. |
| प्रकल्पाचे नांव | : — | नगर परिषद, मंगरुळपीर योजनेच्या दुकान केंद्र विकसित करण्याकरीता. |
| प्रकल्पाच्या कामाचा तपशील | : — | नगर परिषद, मंगरुळपीर योजनेच्या दुकान केंद्र विकसित करण्याकरीता. |
| सामाजिक फायदे | : — | नगर परिषद, मंगरुळपीर योजनेच्या दुकान केंद्र विकसित करण्याकरीता आवश्यक आहे. |

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

## अनुसूची–चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

| | | |
|---|---|---|
| (सामाजिक परिणामाचे निर्धारण करणा-या यंत्रणेने दिल्याप्रमाणे) सामाजिक परिणाम निर्धारणाचा गोषवारा | : — | महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३ मार्च २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण दोन व प्रकरण तीन मधील तरतुदी लागू करण्यापासून सुट प्राप्त. सबब माहिती निरंक. |

## अनुसूची–पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| (अ) ज्या अधिका-याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम | :– | आवश्यक नाही, सबब माहिती निरंक. |
| (ब) प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता | :– | मुख्याधिकारी, नगर परिषद, मंगरुळपीर. |
| (क) प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसूचनेनुसार झाली आहे त्याचा तपशील | :– | मुख्याधिकारी, नगर परिषद, मंगरुळपीर. |

**टीप :-** उक्त जमिनीचा/जमिनीच्या योजनेचे (Plan) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरुळपीर यांच्या कार्यालयात पाहता येईल.

**एस. पी. मुळे,**
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, मंगरुळपीर.

मंगरुळपीर :
दिनांक २७ ऑक्टोबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.